# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 15/11/2023 (बुधवार) दुपार


### शारीरिक व मानसिक छळ करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो. स्टे. काटोल :- फिर्यादी नामे:- सौ. रूचिका विकास कोटकर, रा. ताथवडे पुणे ह. मु. लक्ष्मी नगर काटोल व **आरोपी नामे:- विकास संजय कोटकर, रा. भानुपेठ चंद्रपुर ह. मु. ताथवडे पुणे** हे पती पत्नी असुन फिर्यादी हिने तिचे पतीविरूद्ध तक्रार दिली कि, तिचा पती आरोपी हा तिचे चारीत्र्यावर संशय घेऊन शिवीगाळ करून मारझोड करतो व पगार झाल्यानंतर पैशांची मागणी करतो न दिल्यास लाथबुक्क्यांनी मारहाण करतो. पतीचे त्रासाला कंटाळुन महीला समुपदेशन केंद्र काटोल येथे तकार केली असता आरोपी पती हा वारंवार बोलाउनसुद्धा हजर आला नाही.

सदर प्रकरणी फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ४९८ (अ) भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री. खोब्रागडे मो. नं. ८३०८०८२०९४ या करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. नरखेड – पो.स्टे. नरखेड हद्यीत फिर्यादी हे दिनांक १३/११/२०२३ रोजी दुपारी १६/०० वा. दरम्यान सावरगाव येथे बाजार करण्याकरिता गेले. घरी पत्नी व मुलगी हया दोघीही घरी हजर होत्या. सायंकाळी १७/३० वा. दरम्यान घरी गेले असता पत्नीने सांगीतले की मुलगी ही १७/०० वा. दरम्यान संडासला जातो असे सांगुन गेली व अजुन घरी परत आली नाही. असे सांगीतलेवरून फिर्यादी व फिर्यादीचे पत्नीने तिचा गावात शोध घेतला व नातेवाईकांनासुदधा विचारपुस केली परंतु तिचा आजपावेतो शोध लागला नाही. फिर्यादीची मुलगी वय १७ वर्ष ही तुलेश्वर नारायणसिंग गवारले, रा. राजणी याचेसोबत गेली असावी असा संशय आहे तो सुद्धा गावात हजर नाही किंवा कोणीतरी अज्ञात ईसमाने फिर्यादीचे रखवालीतून फुस लावून पळवून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार अरूण भेंडे, मो. नं. ९९२३१९३६४२ हे करीत आहे.


पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर